**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४५९/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री मनोहर वैजनाथजी बांबोडे
राहुल नगर, बिच्छु टेकडी
अंधविद्यालयाचे मागे, कॅम्प, अमरावती

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे विभाग)
जिल्हा परिषद, अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री पि.एन.पारधी, अधिक्षक लघु पाटबंधारे विभाग, जि.प. अमरावती हजर आहे. जन माहिती अधिकारी तर्फे श्री बशीर सौदागर, वरिष्ठ सहाय्यक, लघु पाटबंधारे विभाग, जि.प. अमरावती हजर आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि.३०/३/११ रोजी जन माहिती अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जि.प. अमरावती यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमुद केला आहे.

*माझ्या १५/१२/०८ च्या अर्जावर मा.मु.का.अ. यांनी शेऱ्याच्या रुपाने अति.मु.का.अ. यांना आदेश असा दिला की अर्जदाराचे म्हणणे ऐकुन नस्ती सादर करा. तसेच मा.अतिरिक्त मु.का.अ. यांनी संबंधित बाबु नशिर सौदागर यांना बोलावून माझ्या समक्ष मौखिक आदेश दिला की यांच्या अर्जानुसार कार्यवाही करा. तसेच मा.मु.का.अ. यांच्या शेऱ्याखाली त्यांनी सुधा शेरा लिहला की कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे त्वरीत कार्यवाही करा. परंतु संबंधित बाबुने दोन्ही मा.मु.का.अ. यांच्या आदेशाचे पालन न करता उलटपक्षी मला पत्र क्र./जिप/पाबं/स्था-१/३३३७/२००८ दि.२२/१२/०८ दिले त्याचे उत्तर मी दि.३१/१२/०८ ला दिले आहे. म्हणजे वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे हा शिस्तभंग नाही काय ? जर असेल तर आपण आजपर्यंत काय कार्यवाही केली त्याची माहिती देण्यात यावी.*

वरील अर्ज सा.प्र.वि. जिल्हा परिषद अमरावती कडुन दि.६/४/११ अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (लघसिंचन) जि.प. अमरावती यांचेकडे कलम ६(३) हस्तांतरीत केला. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग जि.प. अमरावती यांनी ५/१/१२ ला दाखल केलेल्या खुलाशामध्ये माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे देण्यात आली नाही असे नमुद केले आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन केले नाही तर शिस्तभंग होत नाही काय व शिस्तभंग केला असेल तर काय कारवाई झाली त्याबाबत माहिती पाहीजे असल्याचे सांगितले. या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, जोपर्यंत संबंधिताने शिस्तभंग केल्यासंबंधी लेखी आदेश होत नाही तोपर्यंत शिस्तभंग केला असे म्हणता येत नाही. अर्जदाराने दि.१५/१२/०८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती यांचेकडे केलेल्या अर्जावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे यांना तत्पर कार्यवाहीकरीता असे नमुद केले आहे. अर्जदाराने दि.३०/३/११ च्या माहितीच्या अर्जामध्ये अर्जदाराच्या दि.१५/१२/०८ रोजी मु.का.अ. यांचेकडे दिलेल्या पत्रानुसार काय कार्यवाही झाली याची माहिती मागितलेली दिसते. अर्जदाराच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद केलेल्या अर्जदाराच्या दि.१५/१२/०८ च्या अर्जावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग जि.प. अमरावती यांचेकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला आठ दिवसामध्ये लेखी पत्र देवून अवगत करावे असे आदेशीत करण्यात येत आहे. उत्तरवादी तर्फे सुनावणीला आज हजर असलेले प्रतिनिधी यांना तसे सांगण्यात आले व त्यांनी या आयोगासमोर त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे कबुल केले. सदर कारणावरुन अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**- आदेश -**

अर्जदाराच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद केलेल्या अर्जदाराच्या दि.१५/१२/०८ च्या अर्जावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग जि.प. अमरावती यांचेकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला आठ दिवसामध्ये लेखी पत्र देवून अवगत करावे व तसा अहवाल या आयोगास पाठवावा असे आदेशीत करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/